www. sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ८६ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.२० डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

Scan QR code to visit... Epaper Portal

# मूल येथे राज्यातील सर्वोत्कृष्ट कृषी महाविद्यालय करणार–पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची ग्वाही

## विशेष निधी उपलब्ध होण्याबाबत नागपूर येथे आढावा

**चंद्रपूर :** स्थानिक तरुणांचा शेतीकडे कल वाढावा व त्याला कृषी क्षेत्रातील तांत्रिक आणि सखोल ज्ञान मिळावे, यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून मूल येथे कृषी महाविद्यालय उभे करण्याचा संकल्प केला आहे. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी हे महाविद्यालय राज्यातील सर्वोत्कृष्ट राहणार असल्याची ग्वाही राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

मूल येथील कृषी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी वनजमीन वळतीकरण करण्यासंदर्भात तसेच विशेष निधी उपलब्ध होण्यासाठी वनामती (नागपूर) येथे आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी ना.मुनगंटीवार बोलत होते. बैठकीला कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव तथा चंद्रपूरचे पालकसचिव अनुपकुमार, वन विभागाचे प्रधान सचिव वेणूगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य संरक्षक तथा वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., कृषी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. श्यामसुंदर माने, कुलसचिव सुधीर राठोड, सा.बा. विभागाचे अधिक्षक अभियंता अरुण गाडेगोणे, कार्यकारी अभियंता मुकेश



टांगले आदी उपस्थित होते.शेतात राबणारा शेतकरी अन्न पिकवितो, त्यामुळे कृषी क्षेत्रासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, असे सांगून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, कृषी आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रात चांगल्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याला आपले प्राधान्य आहे. कृषी क्षेत्राचे बजेट ४ हजार कोटींवरून किमान १० हजार कोटी असणे आवश्यक आहे, त्यासाठी हा विषय मंत्रीमंडळात ठेवला जाईल.पुढे ना.मुनगंटीवार म्हणाले, मूल येथील कृषी महाविद्यालयाच्या जागेसंदर्भात शासकीय व खाजगी जागा येत्या १० दिवसांत शोधून निर्णय घ्यावा. बांधकामासाठी आवश्यक जागा उपलब्ध न झाल्यास मूल येथील कृषी महाविद्यालयासाठी वनविभागाची जमीन वळती करण्यासाठी १३ कोटी ४८ लक्ष रुपये विशेष निधी भरण्याबाबतचा शासन निर्णय काढण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अंतर्गत मूल येथे शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्यास २८ फेब्रुवारी २०१९ मध्ये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार आतापर्यंत ३५ कोटी एवढे अनुदान विद्यापीठास वितरीत करण्यात आले आहे. मूल – मारोडा येथील कृषी तंत्र विद्यालयाच्या उपलब्ध इमारतीमध्ये सन २०१९–२० या सत्रापासून कृषी महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. १ ऑक्टोबर २०२२ पासून मॉडेल स्कूल, मूल येथे सदर महाविद्यालय भाडेतत्वावर स्थलांतरीत करण्यात आले आहे. सन २०२३–२४ या कृषी शैक्षणिक सत्रात बी.एस.सी. (ऑनर्स) चे एकूण १८९ विद्यार्थी शिक्षण घेत आहे. भविष्यात कृषी महाविद्यालयात वाढणारी विद्यार्थी संख्या व त्या अनुषंगाने लागणारे प्रक्षेत्र, विविध युनीट, क्रीडांगण, नवीन इमारतीचे बांधकाम, विविध कार्यालये, वर्ग खोल्या, १७ कृषी विषयाच्या विविध प्रयोगशाळा, मुला–मुलींचे वसतीगृह, रोजगार निर्मिती केंद्र, शेती प्रयोगाकरीता प्रक्षेत्र, प्रक्षेत्रावरील गोडवून आदींसाठी कृषी महाविद्यालयासाठी ४० हे. आर. मर्यादीत म्हणजे ३९.५० हे. आर जमीन प्रस्तावित केलेली आहे.

## आशिष देरकर यांची विदर्भ अर्थ–वाणिज्य शिक्षक मंडळाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड

**चंद्रपूर :–** येत्या ५ व ६ जानेवारीला नागपूर येथे होणाऱ्या अर्थ–वाणिज्य शिक्षक मंडळाच्या द्वैवार्षिक चर्चासत्राच्या संदर्भात पूर्व तयारीसाठी चंद्रपूर येथील जनता महाविद्यालयात नुकतीच बैठक पार पडली.बैठकीत महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालय, गडचांदूर येथील अर्थशास्त्राचे प्रा. आशिष देरकर यांची अर्थ–वाणिज्य शिक्षक मंडळाच्या चंद्रपूर जिल्हा अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

विदर्भ अर्थ–वाणिज्य शिक्षक मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. एच.एच. हुड्डा यांच्या अध्यक्षतेखाली सदर बैठक घेण्यात आली. यावेळी मंडळाचे माजी सचिव राजाभाऊ दुरुगकर, मंडळाचे मार्गदर्शक तथा सी. पी. बेरार कॉलेज नागपूरचे संचालक प्रा. हिमते, विजुक्टाचे अध्यक्ष तथा मंडळाचे विद्यमान अध्यक्ष डॉ.अशोक गव्हाणकर, सचिव



डॉ.चेतन हिंगणेकर, विजुक्टाचे जिल्हा अध्यक्ष डॉ. प्रवीण चटप यांची प्रमुख उपस्थिती होती.जिल्हा कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी प्रा. योगेश्वर नागोसे, सचिव प्रा. दिनकर झाडे, कोषाध्यक्ष प्रा. दिवाकर मोहितकर, सहसचिव प्रा. अलोक खोब्रागडे, प्रा. कविता नवघरे तर सदस्यपदी प्रा. राकेश डोंगरकर, प्रा. प्रशांत बल्की, प्रा. महेश मालेकर, प्रा. संजय बाबरे, प्रा. नरेंद्र हेपट, प्रा. मयूर वलके, प्रा. प्रशांत मत्ते, डॉ. आशिष कुबडे आदींची सर्वानुमते निवड करण्यात आली. नागपूर येथे होणाऱ्या अर्थ वाणिज्य शिक्षक मंडळाच्या द्वैवार्षिक चर्चासत्रात चंद्रपूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त कनिष्ठ महाविद्यालयातील अर्थ–वाणिज्य विषयाच्या शिक्षकांनी सहभागी होण्याचे आवाहन मंडळाचे अध्यक्ष डॉ. अशोक गव्हाणकर यांनी केले.

## गोंडपिपरीत उरकल्या आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा

**गोंडपिपरी–**गोंडवाना विद्यापिठाअंतर्गत आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा गोंडपिपरीत नुकत्याच पार पडल्या.यावेळी २३ महाविद्यालयांनी यात सहभाग नोंदवला.

स्थानिक चिंतामणी कॉलेज ऑफ आर्ट अँड सायन्स गोंडपिंपरी येथे विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले,७ आणी ८ डिसेंबर दरम्यान झालेल्या या स्पर्धेत गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत येणाऱ्या झोन अ मधील २३ महाविद्यालयांनी सहभाग घेतला.एस.पी.कॉलेज चंद्रपूरच्या महिला कबड्डी चम्मूने प्रथम स्थान,महात्मा गांधी कॉलेज ऑफ सायन्सच्या चम्मूने द्वितीय स्थान तर चिंतामणी कॉलेज गोंडपिंपरीच्या चम्मूने तृतीय स्थान पटकावले.स्पर्धेचे उदघाटन गोंडपिपरीचे ठाणेदार जीवन राजगुरू यांच्या हस्ते झाले.यावेळी ठाणेदारांनी खेळाडूंना दैनंदिन जीवनात खेळाचे



महत्व पटवून दिले.खेळाचे महत्व अनन्य साधारण असून यामूळे मानसिक, शारिरीक,बौद्धिक विकास होतो असे प्रतिपादन केले.मुख्य अतिथी म्हणून चिंतामणी महाविद्यालय,पोंभुर्णा येथील डॉ.गिरीपूंजे यांनी उपस्थित महिला खेळाडूंना खेळाडू वृत्ती कशी जोपसावी,या विषयावर मार्गदर्शन केलं.अध्यक्ष भाषणात प्राचार्य डॉ.मोहन गिरिया यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांनी आवडत्या खेळात भाग घेऊन राष्ट्रीय स्तरावर स्वतःचे व देशाचे नाव केले पाहिजे,असे विचार मांडले.प्रास्ताविक डॉ.रुद्रप्रताप तिवारी,सूत्रसंचालन डॉ.शरद लखेकर तर आभार प्रा.अविनाश चकिनारपूवार यांनी मानले.स्पर्धेत विविध कॉलेजचे प्राध्यापक,महिला कबड्डी खेळाडू तसेच चिंतामणी कॉलेज गोंडपिंपरीचे उपप्राचार्य डॉ.आशिष चव्हाण,प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी आनंदवनला भेट

**आनंदवन :–** १८ डिसेंबर रोजी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी महारोगी सेवा समिती आनंदवनला भेट दिली यांत संस्थेचे विश्वस्त सुधाकर कडु यांनी त्यांचे स्वागत केले.

सर्वप्रथम श्रद्धेय बाबा व ताई. यांच्या समाधीचे दर्शन घेतले. संस्थेच्या सचिव डॉ विकास आमटे. यांची सदिच्छा भेट घेऊन विविध विषयावर चर्चा करण्यात आली नंतर सर्व आनंदवन संस्थेच्या आढावा घेऊन स्वरानंद मध्ये अंध,अपंग कलाकारांनी आर्केस्ट्रा, गीत सादर केले व सर्व अंध, अपंग कलाकाराचे मोहन जोशी यांनी खुप कौतुक केले. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सुधाकर कडु, विश्वस्त सदाशिव ताजने, आनंद निकेतन महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक कमलाकर डुकरे, संकेत कायरकर व संस्थेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.



## अक्षता कलश शोभा यात्रेला नाचणगावकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुलगाव –**अयोध्येवरून आलेल्या अक्षताकलशांचे बसस्टॉप नाचणगांव येथे भव्य स्वागत करण्यात आले. विधिवत ११ जोडप्यांचे हस्ते कलशांचे पूजन करून, कलश डोक्यावर घेऊन शोभायात्रेत सामील झाले.

वाद्यवृंदासह निघालेल्या शोभायात्रेत गावातील रामभक्त मंडळी, युवक युवती, भजनी महिला मंडळे वारकरी मंडळ, दिंडी पताका, राममंदिराची प्रतिकृती, धनुष्यधारी राम, गदाधारी हनुमान झाकी असलेले ट्रॅक्टर मुळे मिरवणुकीला शोभा आली होती. चांदीचा अक्षता कलश असलेला फुलांनी सजवलेला चांदीचा रथ, सजवलेली बैलजोडी हे शोभायात्रेचे मुख्य आकर्षण होते.शोभायात्रेचा मार्ग रांगोळ्यानी सजवलेला होता. यात्रेवर फुलापाकळयांचा वर्षाव करून नागरिकांनी यात्रेचे स्वागत केले ठिकठिकाणी महिलांनी अक्षता कलशांचे पूजन केले. गावातील दुर्गाउत्सव मंडळ, गणेश मंडळानी शोभायात्रेतील नागरिकांसाठी पिण्याचे पाणी, चहाची व्यवस्था केली होती, लहानूजी नगर येथे फटाके फोडून यात्रेचे जंगी स्वागत करण्यात आले.शोभायात्रेच्या यशस्वीतेसाठी अनेकांनी परिश्रम घेतले. सर्व रामभक्तांच्या अथक परिश्रमामुळे ही कलश यात्रा यशस्वी झाली. संपूर्ण



गावाची परिक्रमा करून यात्रा सिद्धेश्वर मंदिर येथील राममंदिरात यात्रा पोहोचल्यानंतर श्रीरामांच्या मूर्तिचे पूजन करून अक्षता कलश मंदिरात ठेवण्यात आले. आरती नंतर प्रसादाचे वितरण करण्यात आले. शोभायात्रेत सामील झालेल्या महिला भजन मंडळाचे तसेच वारकरी मंडळाचे ट्रॅक्टर चालक, धुरकरी यांचा नारळपान देऊन यथोचित सन्मान करण्यात येऊन शोभायात्रेचा समारोप करण्यात आला.

## वाळू निर्गती धोरणानुसारच विक्रीकरीता मुदतवाढ

**चंद्रपूर:** नागरिकांच्या बांधकामांना रेती उपलब्ध व्हावी, या उद्देशाने रेती विक्रीला परवानगी देण्यात आली आहे. उत्खननासाठी कोणतीही परवानगी दिली नाही, असा खुलासा जिल्हा प्रशासनाने केला आहे. विक्रीकरीता मुदतवाढ देण्याची तरतुद वाळू निर्गती धोरण – २०२२ मध्ये आहे. त्यानुसारच वाळू विक्रीला मुदतवाढ देण्यात आली आहे.सन २०२२ –२३ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण ४० रेतीघाटांचा लिलाव ऑक्टोबर २०२२ मध्ये करण्यात आला. त्यापैकी ३८ रेतीघाटांचा लिलाव यशस्वीरित्या होऊन सर्व रेतीघाटांचा करारनामा करण्यात आला. तसेच सदर रेतीघाट संबधीत लिलावधारकांचा ताब्यात देण्यात आले. उक्त रेतीघाटांना राज्यस्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन समितीने २८ फेब्रुवारी २०२३ पर्यंत पर्यावरण मान्यता दिली होती, तथापी सदर रेतीघाटचा करारनामा कालावधीप्रमाणे ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत देण्यात आला होता. जिल्हा प्रशासनाने पर्यावरण मान्यता पुर्नप्रमाणीकरणकरीता ( एर्पीेळीपाशपीं उश्रशरीरपलश ऐींशपीळेप) राज्यस्तरीय पर्यावरण समितीकडे अर्ज सादर केला व समितीने त्यावर पुर्नप्रमाणीकरण करून वाढीव मुदत ३० सप्टेंबर २०२३ पर्यत देण्याबाबतचा आदेश १० मार्च २०२३ रोजी दिलेला आहे. लिलावात गेलेल्या ३८ रेतीघाट धारकांना पर्यावरण मान्यतेचा मुदतवाढीचा लेखी आदेश प्राप्त होईपर्यत उत्खनन बंद ठेवण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून २७ फेब्रुवारी २०२३ रोजी लेखी आदेश निर्गमीत करण्यात आला. तथापी काही लिलावधारकांनी कमी कालावधी मिळत असल्याने लिलावातील रक्कम परत करण्याबाबत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपुर यांच्याकडे याचिका क्रमांक ७४१७/२०२२ दाखल केली.उक्त याचिकेत शासनाच्या वतीने व जिल्हा प्रशासनाच्या वतीने उत्तर दाखल करून पर्यावरण मान्यतेची पुर्नप्रमाणीकरण ( Environment Clearance Extension) ची प्रक्रिया सुरू आहे व मान्यता प्राप्त होताच उत्खनन प्रक्रियाचा आदेश देण्यात येईल, असे सादर करण्यात आले, व त्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपुर यानी सदर प्रकरण निरस्त केले. राज्य पर्यावरण प्राधिकरणने पर्यावरण मान्यतेची मुदत ३० सप्टेंबर २०२३ पर्यत वाढवून देण्यात आल्यानंतर उत्खननाचा कालावधी १० जुन २०२३ पर्यत लिलावधारकांना देण्यात आला होता व साठा केलेल्या वाळू डेपोमधून विक्रीची परवानगी ३० सप्टेंबर २०२३ पर्यत देण्यात आली होती. या दिनांकानंतर वाळू डेपोमधून विक्री करण्यास मनाई करण्यात आली होती व त्या अनुषंगाने पत्र निर्गमीत करण्यात आले.लिलावात गेलेल्या ३८ वाळू डेपोमधून २४ डेपोमध्ये रेतीसाठा शिल्लक असल्याची माहिती सादर करून लिलावधारकांनी शासनाचे वाळु निर्गती धोरण २८ जानेवारी २०२२ मधील प्रकरण ६ परिच्छेद २ उपपरिच्छेद (क) नुसार वाळूडेपो मधून विक्रीची परवानगी मिळण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वितरक परवानाकरिता अर्ज सादर केला.सन २०२३ –२४ मध्ये पर्यावरण मान्यतेकरिता सादर केलेल्या वाळूघाटाच्या प्रस्तावास होत असलेला कालावधी विचारात घेऊन व ३० सप्टेंबर २०२३ पासून स्थानिक लोकांना घरबांधकाम / शासकीय बांधकाम व खाजगी कामाकरीता रेती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने वाळू डेपोमध्ये असलेल्या शिल्लक साठ्याची विक्री करण्यास जिल्हा प्रशासनाने १ डिसेंबर २०२३ पर्यत मुदत दिली आहे. सदर निर्णय हे लोकांना वाळू उपलब्ध व्हावी व लिलावधारकांनी संपूर्ण लिलावाची रक्कम भरून प्राप्त केलेली वाळू नैसर्गिक न्यायतत्वानुसार विक्री करण्याकरीता प्राप्त व्हावी, याकरीता देण्यात आली आहे व यामध्ये कुठेही अनियमितता झालेली नाही, असे जिल्हा प्रशासनाने म्हटले आहे.

## संपादकीय

# माझा आणि माझ्यातला गोवा

गोव्याच्या रामकृष्ण नाईकांचे मित्र राजन तालक यांच्याशी ओळख झाली. तालक हे प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक. त्यांचे गोव्यात मोठे प्रोजेक्ट सुरू होते. त्याबाबतची माहिती देऊन नाईकसाहेब मला म्हणाले, 'अशोक, तू मडगावला एक बंगला घेऊन टाक.' मी किमतीची चौकशी केली, माझे बजेट पाहिले आणि त्यात सगळे गणित बसते हे लक्षात आल्यावर, थोडा विचारविनिमय करून गोव्यात बंगला घेण्याचे नक्की केलं; व्यवहारही पूर्ण केला. एकदा सुट्टीत या बंगल्यात राहायला गेलो असताना तालक मला भेटायला आले आणि म्हणाले, 'मी एक चित्रपट काढतो आहे. संगीत तुम्ही द्याल ना?' मी चित्रपटाची कथा, नाव यांविषयी चौकशी केली तेव्हा समजलं, की तो चित्रपट कोकणी भाषेत होता. तो चित्रपट तर मी केलाच, त्यानंतरही आम्ही एकत्र आठ-दहा चित्रपट कोकणी भाषेत आणि मराठीतही केले. त्यांच्याच 'अंतर्नाद' या कोकणी भाषेतील चित्रपटासाठी मला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.गोव्याचेच आमचे दुसरे एक मित्र दीप घारापूरकर. त्यांना कोकणी गाण्याचा अल्बम काढायचा होता. शंकर महादेवन, शान, हरिहरन, वैशाली सामंत यांच्याशी बोलून मी अल्बम काढला. दीप यांच्याबरोबर कोकणी भाषेतील पन्नास गाणी केली आहेत. त्यात शंकर महादेवन, शान, साधना सरगम, हरिहरन, अवधूत गुप्ते, स्वप्नील बांदोडकर, वैशाली सामंत, बेला सुलाखे, महालक्ष्मी अय्यर अशा मोठमोठ्या गायकांनी गाणी गायली आहेत. तेही आमच्या बजेटनुसार. याला खरे प्रेम म्हणतात. या सगळ्या गायकांनी माझ्यावर भरभरून प्रेम केले आहे. मागील वर्षी मी गोव्याला गेलो होतो. पंचमीला शांतादुर्गा देवीचे दर्शन घेतले. नंतर सरळ मडगावला माझ्या 'नानू टेल' या आवडीच्या हॉटेलात राहायला गेलो. दीपला फोन केला, की मी गोव्यात दोन दिवस राहायला आलो आहे. यावर दीप लगेच म्हणाला, 'संध्याकाळी आपण जेवायला एकत्र जाऊ या. त्या आधी आपण हुबळीला दामोदरांचे भले मोठे देऊळ आहे, ते पाहायला जाऊ या.' दीप आणि दोन-तीन मित्रांसोबत मी देऊळ पहायला गेलो. ते भव्यदिव्य देऊळ होते. मला तेथील पुजारी भेटले आणि म्हणाले, 'अशोकजी तुमच्या गाण्यावर आम्ही सारे फिदा आहोत. आमच्या दामोदरावरही एक भक्तिगीत करा.' दीपही म्हणाला, 'विचार करा. यासाठी होणारा सगळा खर्च मी करीन.' मी लगेच मुंबईला आलो. साधारण चार दिवसांत माझी डमी शब्दांसह चाल तयार झाली होती. ती चाल मी दीपला पाठवली. त्याला आणि सर्व कुटुंबीयांना ती चाल प्रचंड आवडली. कवी राजय पवार यांनी मग त्या चालीवर कोकणी गीत लिहिले. दामोदर म्हणजे कृष्णाचा एक अवतार असे म्हणतात, तर त्याच अनुषंगाने त्यांनी गाणी लिहिली. यानंतर १५ दिवसांनी मी गोव्याला गेलो, तिथे दीपने स्टुडिओ बुक केला होताच. सिद्धार्थ सोडनकर आणि गौतमी हेदे हे गायकही त्याने निवडले होते. सिद्धार्थ आणि गौतमीने ते गाणे इतके जीव ओतून गायले, की ज्यांनी ज्यांनी गाणे ऐकले, त्यांना ते खूप आवडले. तीन-चार महिन्यांत या गाण्याने गोव्यात अमाप लोकप्रियता मिळवली. मुंबईचा माझा अरेंजर मित्र समीर म्हात्रे याने या गाण्याचा ट्रॅक इतका उत्तम बनविला होता, की त्याला तोड नाही. साधारणपणे चित्रपटसृष्टीत निर्माता-दिग्दर्शक, गीतकार आणि संगीतकार असा एक ग्रुप तयार होतो. तालक यांच्या बाबतीत चित्रपट बनविताना तसेच व्हायचे. दीपचा अल्बम बनविताना दीपची माणसे असायची, म्हणजे शंकर महादेवन, शान वगैरे. आपली नेहमीची माणसे दिसली, की उत्साह आणि बळ वाढते. काम करताना मजा येते आणि काम चांगलेही होते.करोना काळात तालक यांनी चित्रपट करणे बंद केले होते. अलीकडेच त्याने त्याच्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त मला; तसेच सुकन्या मोने, ऋषीकेश रानडे, महालक्ष्मी अय्यर व सत्यजित प्रभू या सगळ्यांना विमानाची तिकिटे पाठविली होती. त्या निमित्ताने आमचे फारच छान गेट टुगेदर झाले. आम्ही दोन दिवस गोव्यात धमाल केली. तिथून निघताना तालक मला म्हणाला, 'अशोकजी, एप्रिल महिन्यात सिनेमा करणार आहे. मला छान विषय मिळाला आहे. गाण्यांना चित्रपटात चांगला वाव आहे. अशोक पत्की स्टाइलची गाणी करायची आहेत.' मी म्हटले, 'मी तर तयारच आहे.' त्यावर त्याने मला सुचविले, की मी आठ दिवस गोव्यात राहायला जावे. तिथे मला तो हार्मोनियम आणि एक खोली देईल, निवांत काम करायला. तिथे बसून मी गाणी तयार करायची. मला त्याची ही कल्पना आवडली. आता मला गोव्यात जावे लागणार आहे आणि गोवा म्हटले, की कोणताही कलाकार एका पायावर तयार होतो; कारण येथील निसर्गसौंदर्य सगळ्यांना भुरळ घालणारे आहे. येथील बीच, चर्च, रस्ते, देवळे; तसेच एकाच पद्धतीचे बंगले पाहून मन भरून येते. मनाला एक प्रकारचा आनंद मिळतो. तेथील वातावरण आणि हवा आपल्यामध्ये सकारात्मक बदल घडवून आणते. गोवन पदार्थ तर कमालीचे स्वादिष्ट असतात. मांसाहार करणाऱ्यांची चंगळच चंगळ असते. तेथील कोकणी भाषेत आपलेपणा आहे, गोडवा आहे. माझे कुलदैवत शांतादुर्गा असल्यामुळे, दोन-तीन महिन्यांतून एकदा तरी मी गोव्याला जातोच. मंगेशी, शुंळोचतादुर्गा, महालक्ष्मी देवी यांच्या मंदिरात जातो. देवींचे दर्शन घेतल्यामुळे मन प्रसन्न होते. मनाला उभारी येते. कुमार सर ज्योतिषी आणि पेंडसे भटजी या दोघांकडे प्रसादाचे जेवण मिळते. त्या जेवणाला तोडच नाही. गोव्याहून आला, की माणूस तरतरीत होतो असे म्हणतात, ते काही खोटे नाही. सन १९८२मध्ये माझे लग्न झाले, तेव्हा कुलदैवतेच्या दर्शनाला मी विमानाने गेलो होतो. तेव्हा विमानाचे तिकीट फक्त ८० रुपये होते. गोव्याच्या अशा अनेक आठवणी माझ्या मनात अजूनही ताज्या आहेत. मी गोव्याचा असल्यामुळे, मला त्याचा अभिमानही आहे. माझ्या स्वभावात आणि माझ्या खाण्यातही गोवा प्रामुख्याने दिसतो, तो त्यामुळेच.

# आदिवासींच्या आयुष्यात आरोग्यसेवेची पहाट



आदिवासी समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्यसुविधा प्रभावीपणे पोचवण्यासाठी व्यवस्थात्मक आणि धोरणात्मक सुधारणा केल्या आहेत. त्याचे चांगले परिणाम दिसत आहेत.'जेव्हा आपल्या आदिवासी समाजाची भरभराट होईल तेव्हाच भारताची भरभराट होईल. आदिवासी समाजाच्या कल्याणाला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे.'- पंतप्रधान नरेंद्र मोदी

'सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शक तत्त्वज्ञानाचे अनुसरण करत आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी दाखवलेल्या अंत्योदयाच्या मार्गाला स्मरत भारत सरकारचे मार्गक्रमण सुरू आहे.

समाजाच्या सर्व घटकांपर्यंत, विशेषत: सर्वात उपेक्षित आणि असुरक्षित समुदायांपर्यंत विकासाचे फायदे पोचवणे ही सरकारची मूलभूत बांधिलकी आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री मनसुख मांडवीय यांच्या नेतृत्वाखाली, समाजाच्या सर्व घटकांपर्यंत, विशेषतः आदिवासी समाजातील प्रत्येक वर्गापर्यंत आरोग्य सेवा पोचते की नाही याची खातरजमा करण्यासाठी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने यथायोग्य काळजी घेतली आहे.राष्ट्रीय आरोग्य मोहिमेने (नॅशनल हेल्थ मिशन-एनएचएम) सुरुवातीपासूनच सर्वांना समान, परवडणाऱ्या दरात, खात्रीलायक आणि परिणामकारक आरोग्य सेवा देण्यास प्राधान्य दिले आहे. आदिवासी भागांसह इतर भागातील असुरक्षित समाजघटकांपर्यत आरोग्यसेवा पोचतील याची काळजी घेतली जात आहे.त्या-त्या भागातील स्थानिक गरजांनुसार, राज्यांना विविध स्तरावर विविध भागांमध्ये आरोग्यसेवा देता याव्यात या दृष्टीने राष्ट्रीय आरोग्य मोहिमेने आरोग्य नियोजनाच्या विकेंद्रीकरणावर लक्ष केंद्रित केले आहे.राष्ट्रीय आरोग्य धोरण-२०१७ ने आदिवासी आणि सामाजिकदृष्ट्या असुरक्षित लोकांच्या विशेष आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन, या भागांत आरोग्यसेवांची तरतूद करत, त्यांच्या वितरणासाठी विशिष्ट उपाययोजनांची शिफारस केली आहे. आदिवासी मूल्य प्रणाली, परंपरा, सामाजिक-आर्थिक स्थिती यांच्या अनुषंगाने आदिवासींच्या आरोग्यविषयक समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी केंद्रीय आदिवासी विकास तसेच शेतकरी कल्याण मंत्री अर्जुन मुंडा यांच्या नेतृत्वाखाली मंत्रालय बांधिल आहे.

### आयुष्मान आरोग्य मंदिर


आरोग्य व्यवस्थेंतर्गत येणाऱ्या सर्व क्षेत्रांतील कार्यवाहीची रचना, केवळ सर्वांपर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पुरवण्यासाठीच नाही तर आदिवासी भागातील सेवा वितरणाला प्राधान्य देण्यासाठी, ते प्रभावीपणे होण्यासाठी केलेली आहे. सार्वजनिक आरोग्य सुविधांची सुरुवात करण्यासाठी नियम शिथिल करणे, प्रत्येक वस्तीवर आशा कर्मचारी नियुक्ती करणे या दिशेने काही पावले उचलली आहेत.आयुष्मान आरोग्य मंदिर (एएएम) हा प्रमुख उपक्रम २०१८ मध्ये छत्तीसगडमधील जंगला या आदिवासी भागात (ब्लॉक-गट) सुरू करण्यात आला. आता या उपक्रमाने देशभरातील ग्रामीण आणि आदिवासी भाग व्यापला असून, १.६३ लाख आयुष्मान आरोग्य मंदिरे सध्या कार्यरत आहेत. वस्तीजवळच सर्वंकष प्राथमिक आरोग्य सुविधा देता यावी अशा प्रकारे या केंद्रांची रचना केली आहे.तर आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत आर्थिक संरक्षणाची (मदत) हमी देत, दुय्यम व तृतीय श्रेणी सेवादेखील सर्वांना परवडण्याजोग्या बनवल्या जात आहेत; ज्यात अदिम आदिवासी गट लाभार्थी म्हणून पात्र ठरवले आहेत. राज्याच्या सरासरीपेक्षा कमी सर्वसाधारण आरोग्य निर्देशांक असलेले सर्व आदिवासीबहुल जिल्हे, उच्च प्राधान्य जिल्हे (हाय प्रायोरिटी डिस्ट्रिक्ट्स-एचपीडी) म्हणून निश्चित केले असून, त्यांना राष्ट्रीय आरोग्य मोहिमेंतर्गत दरडोई वाढीव साधनसामुग्री मिळते. यामुळे, आदिवासी समुहातील विविध वर्गांना भेडसावणाऱ्या आरोग्यसेवाविषयक आव्हानांना तोंड देण्यासाठी नवनवीन पद्धती उपयोगात आणण्याकरता, राज्ये/जिल्ह्यांना नवनवीन कल्पना राबवता येतात.

### विविध उपक्रम

राष्ट्रीय आरोग्य मोहिमेंतर्गत केलेल्या तरतुदींद्वारे आरोग्यसेवेची उपलब्धता अधिक सुलभ झाली आहे. या तरतुदींनुसार, फिरती वैद्यकीय सुविधा पथके (मोबाईल मेडिकल युनिट्स-एमएमयू) तैनात करता येतात किंवा कमी लोकसंख्येच्या भागातही राष्ट्रीय रुग्णवाहिका सेवा पुरवता येऊ शकते.या क्षेत्रांतील आरोग्य कर्मचाऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, करारान्वये कंत्राटी तत्त्वावर विशिष्ट सेवा घेणे व देणे, 'तुम्ही सांगा, आम्ही पूर्तता करतो' या तत्त्वानुसार मोबदल्याबाबत वाटाघाटी, दुर्गम भागातील सेवेसाठी विशेष भत्ते आणि आरोग्य सेवेत कारकिर्द घडवण्यासाठी प्रगतीच्या नवनव्या संधी खुल्या करणे यासारख्या तरतुदींची हमी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने दिली आहे.आदिवासी भागातील आरोग्यसेवांना प्राधान्यासाठी आणि त्यांच्या नियोजनासाठी, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण, तसेच आदिवासी व्यवहार या दोन्ही विभागांनी परस्पर सहकार्याने आदिवासी आरोग्य कक्ष स्थापला आहे. तो आदिवासी भागातील आरोग्य सेवांच्या विविध क्षेत्रांमध्ये एकमेकांच्या सहयोगाने कार्यवाही करण्याला प्रोत्साहन देण्यासाठी व्यासपीठ म्हणून काम करतो.विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांमध्ये आदिवासी भागांचा समावेश आहे की नाही याच्या खात्रीसाठी समुदाय स्तरावर उपक्रम राबवणे ही महत्त्वाची बाब आहे. जागरूकता निर्माण करणे, आयुष्मान भारत आरोग्य खाते क्रमांक तयार करणे, प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्यसेवा उपक्रम आणि त्वरीत रोगनिदानासाठी शारीरिक तपासणी, मूलभूत आरोग्यनिगा सेवा व दूरसंचार सेवेद्वारे वैद्यकीय सल्ला पुरवणे अशा उद्देशाने राष्ट्रीय आरोग्य मोहिमेंतर्गत गट आरोग्य मेळाव्यांसारखे समुदाय स्तरावरील उपक्रम हाती घेतले आहेत.आदिवासी आरोग्य विभागाच्या पुरेशा सहभागासह गट आरोग्य मेळावे घेताना सरकारच्या आंतरविभागीय समन्वयाला प्राधान्य दिले जाते. यामुळे संपूर्ण आदिवासी समाजापर्यंत सुविधा पोचून, सर्व सेवांचा लाभ त्यांना देणे शक्य झाले आहे.आयुष्मान भव अभियान आणि विकसित भारत संकल्प यात्रा यांसारख्या मोठ्या प्रमाणावरील समुदाय-आधारीत मोहिमांनी, अत्यावश्यक आरोग्य सेवांपासून कुणीही वंचित राहणार नाही, यासाठी सरकारच्या प्रयत्नांमध्ये भर घातली आहे. देशभर आरोग्य सेवेच्या उपलब्धतेची सुलभता आणिव सर्वसमावेशकता यांची पद्धत पुन्हा नव्या चांगल्या प्रकारे कार्यान्वित करणे आणि त्यात संपूर्ण समाजाला सामावून घेणारा दृष्टिकोन यामधून प्रतीत करणे हे मोहिमांचे उद्दिष्ट आहे.नागरिकांना सरकारच्या योजनांची माहिती देवून त्यांचा लाभ देणे, जनजागृती व कल्याणकारी उपक्रमांचे लाभ थेट लोकांना पोचवण्यावर भर आहे. तसेच विकसित भारत संकल्प यात्रेची एकंदर रचना आणि आराखडा तयार केला आहे. अशा प्रकारे आदिवासी समाजावर लक्ष केंद्रीत करून समुदाय स्तरावर सेवांचा लाभ वाढवणे विकसित भारत संकल्प यात्रेद्वारे शक्य होत आहे. आदिवासी भागांमध्ये रोग निवारणासाठी राबवलेल्या उपक्रमांमध्ये, भारत सरकारने सिकलसेल निमिया निर्मूलन मोहीम ही राष्ट्रीय आरोग्य मोहिमेचा भाग केली आहे. त्याचा उद्देश सर्वांना परवडणाऱ्या दरात, सहज आरोग्यसेवा देणे हा आहे. जनजागृती आणि समुपदेशन संबंधित उपक्रम, आदिवासी व्यवहार मंत्रालयाच्या सहकार्याने हाती घेतले आहेत. सरकारने अलीकडेच आरोग्य आणि पोषण यासह नऊ मंत्रालयांच्या माध्यमातून अकरा महत्वाचे उपक्रम राबवण्यासाठी सुमारे २४ हजार कोटी रुपयांच्या तरतुदींसह प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान PMAJANMAN सुरू केले आहे. सध्याच्या धोरणात्मक सुधारणांसह सरकारने आदिवासी आरोग्य हे अग्रक्रमाचे क्षेत्र निश्चित केले आहे.यामुळे प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत परवडणाऱ्या दरात आणि योग्य, समान दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध होत आहे. धोरणे आणि उपक्रमांची संपूर्ण मालिका यांच्या द्वारे आदिवासींना द्यायच्या आरोग्य सेवेमध्ये व्यवस्थात्मक सुधारणांना केंद्रस्थानी ठेवले आहे.

- डॉ. भारती पवार

# दिव्याखालचा अंधार



अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार असताना २२ वर्षांपूर्वी संसदेवर पाकिस्तानी दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. नेमक्या त्याच दिवशी काही तरुणांनी लोकसभेत आणि संसद भवनाच्या बाहेर सुरक्षा कवच भेदावे आणि गोंधळ माजवावा, ही धक्कादायक घटना तर आहेच; पण देशातील सर्वोच्च प्रतिनिधीगृहातील सुरक्षा यंत्रणा आणि व्यवस्था किती ठिसूळ आहे, याचे दु:खद दर्शन घडविणारी आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार दहशतवाद, नक्षलवाद, फुटीर चळवळी आणि दंगलखोर यांच्या विरोधात कठोर कारवाई करीत असल्याचे दाखले उठल्याबसल्या दिले जातात. याबाबत सरकार किती कठोर आहे, हे सांगण्यासाठी लोहपुरुष सरदार पटेल यांचे नाव असंख्यवेळा घेतले जाते. अशा या 'पोलादी पंजे' असणाऱ्या केंद्र सरकारला देशातील सारे लोकप्रतिनिधी जिथे जमतात, नव्या कायद्यांना जन्म देतात आणि देशातील जनतेच्या वेदना वेशीवर टांगतात; ते संसद भवन सुरक्षित राखता येऊ नये, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. खरेतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच संसदेत येऊन या प्रकरणी निवेदन करण्याची आवश्यकता होती. आपल्या गलथानपणामुळे कोट्यवधी मतदारांचे प्रतिनिधी असणाऱ्या खासदारांचे प्राण धोक्यात येऊ शकले असते, याची केंद्र सरकारला शरम वाटायला हवी आणि ती सरकारच्या वागण्या-बोलण्यातूनही जाणवायला हवी. प्रत्यक्षात, लोकसभेत १४ आणि राज्यसभेत एका खासदाराला निलंबित करण्यात आले आहे. गृहमंत्र्यांनी सभागृहात येऊन निवेदन द्यावे, ही विरोधकांची मागणी मुळीच गैर नव्हती आणि केंद्र सरकारने तिचा आदर करायला हवा होता. तसे न करता खासदारांनाच निलंबित करून टाकणे, ही हडेलहप्पी झाली.संसदेत घुसलेले तसेच त्यांचे बाहेरचे साथीदार असे काही संशयित सापडले. यातल्या चौघांना सात दिवसांची कोठडी मिळाली आहे. पोलिस एका सूत्रधाराच्या शोधात आहेत. हे सगळे तरुण देशभरातील विविध गावे-शहरांमधील आहेत. त्यांचा परस्परांशी संपर्क ई-मेल किंवा तत्सम आधुनिक संपर्क माध्यामातून होत होता. दिल्लीत एकत्र जमून असा निषेध करण्यासाठी त्यांनी बरीच तयारी केली असणार, हे तर उघडच आहे. व्यवस्थित आखणी आणि 'रेकी' केल्याशिवाय असे थेट संसदेत उडी मारणे कुणालाही शक्य नाही. या तरुणांकडे काही प्राणघातक शस्त्रे किंवा इतर सामग्री नव्हती, हे केवळ सुदैव म्हणावे लागेल. तसे ते असते आणि सुरक्षा कवच भेदून त्यांच्यासोबत आत गेले असते तर मोठाच अनवस्था प्रसंग ओढवला असता. संसदेवरील मागचा हल्ला झाल्यानंतर आपल्या सुरक्षा यंत्रणांनी गिरवलेले धडे किती कुचकामी आहेत, याचाच प्रत्यय या निमित्ताने आला. आता सरकारने वेगाने पावले टाकली आहेत. प्रेक्षक गॅलरी कदाचित काचांनी बंदिस्त होईल. खासदारांना मिळणारे पास कमी होतील. ही नवी बंधने पत्रकारांपर्यंत आली, तरी आश्चर्य वाटायला नको. नवे संसद भवन बांधताना प्रेक्षक गॅलरी आणि खासदारांची आसनव्यवस्था यांच्यात इतके कमी अंतर का ठेवण्यात आले, हा प्रश्न आता विचारला जाईल. मात्र, त्याहीपेक्षा नव्य संसद भवनातील सुरक्षा व्यवस्था कडेकोट का नव्हती, हा मूलभूत प्रश्न विचारायला हवा. त्याचे उत्तर केवळ खासदारांनाच नव्हे तर साऱ्या देशालाही मिळणे आवश्यक आहे.संसदेत घुसलेल्या या तरुणांपैकी काही बेरोजगार आहेत. काही स्पर्धा परीक्षांची तयारी करीत आहेत. यातला मराठी तरुण लष्कर किंवा पोलिस दलात जाण्याचे प्रयत्न असफल ठरत असल्याने निराश झाला होता, असेही सांगितले जाते. कोणतीही हिंसा न करता केवळ लक्ष वेधून घेण्यासाठी या तरुणांनी हे कृत्य केले आहे का, हे तपासात कळेलच. त्यांना कोणत्याही संघटनेचा पाठिंबा किंवा फूस आहे का, हे ही कळेल. मात्र, देशातले तरुण अशी संसद भवनावर धडक देतात आणि सरकारच्या विरोधात घोषणा देतात, यातली व्यापक वेदनाही लक्षात घ्यायला हवी. भारतीय दंड विधानाच्या अनेक कलमांखाली बसणारे गुन्हे त्यांनी केले आणि ते अक्षम्य आहेत; म्हणून त्यांची वेदना किंवा कैफियतही चूक किंवा गैर आहे, असे सरकारने मानता कामा नये. या तरुणांवर 'देशद्रोही' असा शिक्का मारणे सोपे आहे. तशी कलमेही लावता येतील. मात्र, सरकारने आणि व्यवस्थेने त्यांचे काही गंभीर म्हणणे आहे का, हेही तपासायला हवे. हे तरुण आणि 'इस्लामिक स्टेट'सारख्या संघटनांमधील दहशतवादी तरुण यांच्यात फरक करणारी नजर कायद्याला नसली तरी ती समाज आणि सरकारला हवी. नवे संसद भवन आपण संपूर्ण सुरक्षित बनवू शकलेलो नाही, याचा धडा मोदी सरकारला तुलनेने कमी किंमत मोजून मिळाला आहे. सत्ताधारी पक्षातील अनेकांना फार लंब्याचवड्या गप्पा मारण्याची अलीकडे सवय जडली आहे. या घुसखोरीने त्यांना थोडे भान यावे आणि केंद्र सरकारलाही दिव्याखाली कधी कधी अंधार असू शकतो, याचे विनम्र भान यावे, अशी अपेक्षा आहे.

# खड्डे चुकविताना बसचा अपघात;एक गंभीर जखमी तर १६ प्रवासी किरकोळ जखमी

## सतीश वारजुकर यांनी केले तीनशे कार्यकर्त्यांसह रस्ता रोको आंदोलन



**चिमूर**–चिमूर ते कान्पा या रस्त्यावरील कवडशी देश फाट्यावर रस्त्यातील खड्डे चुकविताना बसचा स्टेरिंग राड तुटला आणि त्यामुळे बस शेतात घुसल्याने एक प्रवासी गंभीर जखमी तर १६ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहे.त्यामुळे संतप्त प्रवासी तसेच परिसरातील कवडशी पाचगाव,आजगाव,खैरी, शंकरपूर येथील नागरिकांनी व डॉ सतीश वारजुकर यांनी रस्तो रोको आंदोलन केले व जोपर्यंत उपविभागीय अभियंता या ठिकाणी हजर होणार नाही तोपर्यंत रास्ता रोको आंदोलन थांबवण्यात येणार नाही असा पवित्रा घेतला त्यामुळे तीन तास चालणाऱ्या या आंदोलनात रस्त्याच्या दोन्ही बाजूला दोन किलोमीटर वाहनाच्या रांगा लागलेल्या होत्या.

मागील दोन वर्षापासून या राज्य महामार्गाची दुर्दशा झाली असून जागोजागी खड्डे पडलेले आहे. या रस्त्याचे खड्डे बुजवण्यासाठी सामाजिक सोबत राजकीय संघटनेने सुद्धा निवेदन दिलेले आहे. परंतु त्या निवेदनाची दखल सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतलेली नाही या खड्ड्यामुळे कितीतरी अपघात झालेले असून मंगळवार ला सकाळी चिमूर वरून भंडारा ला जाणारी बस क्रमांक एम एच ४० बि एल ३९८८ खड्डा चुकवत असताना कवडशी देश फाट्यावर शेतात घुसली या बस मध्ये जवळपास ९० प्रवासी होते त्यात एक प्रवासी जखमी तर १६ प्रवासी व शालेय विद्यार्थी जखमी झाले आहे.सदर जखमी प्रवाशांना प्राथमिक आरोग्य केंद्र शंकरपूर येथे उपचार सुरू आहेत तर काही प्रवाश्यांनी खाजगी दवाखान्यात उपचार घेतले आहे. ही बाब जिल्हा परिषदेचे अध्यक्ष डॉ सतीश वारजुकर यांना माहीत होताच रुग्णवाहिका बोलाऊन जखमीन्ना दवाखान्यात पाठविले तसेच आज पर्यंत दिलेल्या निवेदनाची दखल न घेतल्यामुळे रस्ता रोको आंदोलन सुरू केले तसेच शंकरपूर ग्रामपंचायतचे सरपंच साई वारजूकर यांनी प्रवाशांना नास्ता व पाण्याची व्यवस्था केली भिसी पोलीस ठाण्याचे ठाणेदार राऊत व चिमूर चे ठाणेदार मनोज गभने हे ताफ्यासह हजर झाले व जमावाला शांत करून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याचा प्रयत्न केला गेला परंतु नागरिकांनी जोपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता उपगंडलावार हे घटनास्थळी हजर होणार नाही तोपर्यंत रास्ता रोको आंदोलन थांबवणार नाही असा हट्ट धरला त्यामुळे ठाणेदार प्रकाश राऊत यांनी पोलीस ची गाडी पाठवून इंजिनीयर यांना पोलीस संरक्षणात सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता उपगंडलावार यांना घटनास्थळी उपस्थित केले.त्यानंतर त्यांनी खड्डे बुजविण्याचे काम बुधवार पासून तर नवीन रस्त्याचे काम पंधरादिवसात सुरू करण्याचे आश्वासन दिल्याने रस्ता रोको आदोलन मागे घेण्यात आले.यावेळी माजी उपसभापती रोशन ढोक कवळशी चे उपसरपंच बाबा देशमाने खैरी चे माजी उपसरपंच लक्ष्मण खेडेकर,दामोधर ननावरे,अशोक चौधरी,नितीन सावरकर,आसू हजारे तसेच बरेच काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते उपस्थित होते.

**चिमूर ते कान्या या रोडने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त असून त्या प्रमाणात एसटी महामंडळाच्या बसा कमी असल्याने भरगच्च बसा भरून चालतात त्यामुळे या महामार्गावर बसांची संख्या वाढवण्यात यावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.**

---

## सेंट जॉनच्या विदयार्थीनींचे विज्ञान प्रदर्शनीमध्ये भरघोस यश




**पुलगाव :** देवळी येथे आयोजीत करण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शनीमध्ये सेंट जॉन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. त्यात श्रेयस पाटील आणि प्रणव परिसे वर्ग ८ यांनी तालुकास्तरावर द्वितिय क्रमांक प्राप्त केला आहे. तसेच त्यांची जिल्हा स्तरावर निवड करण्यात आली आहे.गुणवंत अशा विद्यार्थीचा शाळेच्या अध्यक्ष प्रिती बोरसे, शाळेचे प्राचार्य संतोष यादव , उपप्राचार्या आरती कुरझडकर , उपप्राचार्य महेंद्र भोयर तसेच, शाळेचे सर्व शिक्षकवृंद यांनी त्यांचे अभिनंदन केले.त्यांचे मार्गदर्शक सुनिता ठोंबरे तसेच अस्मा खालिक यांचे सुद्धा सर्वांनी अभिनंदन केले.

## दिव्यांग विदयार्थीना साहित्य वाटप

**मूल प्रतिनिधी**

समग्र शिक्षा समावेशित शिक्षण उपक्रमा अंतर्गत, दिव्यांग विद्यार्थी यांना गट साधन केंद्र, पंचायत समिती, मुल येथे साहित्य वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयश्री गुज्जनवार विस्तार शिक्षण अधिकारी, प्रमुख पाहुणे दयाराम भाकरे केंद्र प्रमुख सुशी, सुनील गेडाम केंद्र प्रमुख टेकडी, वासुदेव आत्राम केंद्र प्रमुख चिखली, सतिश राजुरवार जेष्ठ पत्रकार मुल उपस्थित होते. दिव्यांग विदयार्थीना गतिशीलतेतील मर्यादा कमी करण्यासाठी व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सुरक्षित पणे ये – जा करता यावे तसेच शाळेत सामान्य विद्यार्थ्यांसोबत समायोजन करून अध्ययन अध्यापनातील व सामाजिक अंतर क्रियेतील मर्यादा कमी करून समता प्रस्थापित करणे हा मुख्य उद्देश आहे.या करीता समग्र शिक्षा, समावेशित शिक्षण उपक्रमा द्वारे व्हिल चेअर, रो – लेटर, श्रवण यंत्र, ट्रायसिकल, सी पी चेअर, कमोड चेअर चे वितरण करण्यात आले. या प्रसंगी साहित्याचा महत्त्व व वापर कसा करायचा ,काळजी कशी घ्यावी,या



संदर्भात उपस्थित पालकांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईश्वर लोनबले विशेष शिक्षक, प्रास्ताविक संतोष सोनवणे समा. तज्ञ तर यासाठी विवेक डांगे समा. तज्ञ, यशवंत शेट्टे, निलेश शेणमारे, स्वप्निल मेश्राम विशेष शिक्षक यांनी सहकार्य केले.

## मुल येथे आमदार भास्कर जाधव यांचे जंगी स्वागत

**मूल प्रतिनिधी**

मुल येथे विदर्भ संपर्क प्रमुख आमदार भास्कर जाधव यांचे जंगी स्वागत करण्यात आले. चंद्रपुर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना जिल्ह्यात मेळावा तथा पदाधिकारी बैठकीला जातांना मुल शहरातील गांधी चौक येथे थांबून गांधीजींच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला .त्या नंतर शिवसेना तालुका प्रमुख प्रशांत गट्टूवार यांनी त्यांचं शाल श्रीफळ देऊन स्वागत केल.आणि सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांची आमदार जाधव यांनी आस्थेने विचारपूस केली आणि नगर परिषद,जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणुकीची तयारी ला लागा मी स्वतः मुल शहरात येऊन लक्ष घालेन असे आश्वासन दिले.सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांचं मनोलबल या वेळी वाढले असून सर्व पदाधिकारी यांना निवडणुका संदर्भात निर्देश दिले. यावेळी वेळी प्रामुख्याने युवासेना तालुका प्रमुख रितीक संगमवार,शहर प्रमुख आकाश राम,युवा शहर प्रमुख अमित आयालानी,मनोज मोहूर्ले,महेश चौधरी,सुनील काळे,नयन यलचलवार,हितेश निकोडे,युवी कोरडे,विनोद चलाख, गितेश घोडे,धनु लेंनगुरे,अनुराग आत्राम,संदीप रायपुरे,यश



संगमवार,विशाल नालूरवार आदी शेकडो कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

---

## मूल तालुक्यातील अवैध उत्खनन थांबवावे–दत्तात्रय समर्थ

**मूल प्रतिनिधी**

मूल तालुक्यातील अवैध रेती, मुरूम, भिसी चे उत्खनन थांबविण्याची मागणी सामान्य कामगार चे जिल्हा कार्याध्यक्ष दत्तात्रय समर्थ यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन केली आहे.मूल तालुक्यातील सर्व घाटातील रेती उपसा व वाहतूक प्रक्रिया ३१सप्टेंबर २०२३पासून संपली आहे. मूल तालुक्यातील लिलाव झालेला नसतांना भादुर्णा, डोंगरगाव,चीचाळा,हळदी,नलेश्वर भेजगाव इतर घाटावर मोठ्या प्रमाणात रेतीचे अवैद्य उत्खनन व वाहतूक सुरु आहे.त्यामुळे शासनाचा महसूल बुडत असून मोठी हानी होत आहे.घाटावर साठा करून ठेवलेल्या रेतीची वाहतूक सुरु आहे ही वाहतूक विना परवाना अवैधरीत्या सुरु आहे. महसूल अधिकारी व कर्मचारी याकडे दुर्लक्ष करीत आहे. रेती सोबतच विविध ठिकाणावरून मुरूम भिसी मातीचे उत्खनन व वाहतूक बेधडक सुरु आहे वाहतूक परवानगी पेक्षा अधिक पटीने या गोणखनिजांचे



उत्खनन व हायवे गाड्यांद्वारे उपसा करीत असल्याने मजुरांवर उपासमारीची वेळ येत आहे त्यामुळे कामगारांवर अन्याय होत आहे.या बाबिंची गंभीरतेने चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.निवेदन देतांना लक्ष्मण चटारे, बंडू गुरुनुले,विनोद आंबटकर,प्रमोद गेडाम,अरविंद दहिवले, संतोष चिताडे,भाऊजी लेनगुरे,नितीन देशमुख,कृणाल शेरकी,बंडू घेर,प्रभाकर कावळे,वनराज बेडूकर,सत्यवान गेडाम, देवानंद पेरके,वनराज पेडूकर आदी उपस्थित होते.

## एकनाथ खडसे यांची भेट घेऊन राजेंद्र कन्नमवार यांनी मानले आभार

**मुल:**– नागपूर मध्ये सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशन मध्ये वरिष्ठ सभागृहातील सदस्य माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी विदर्भाचे सुपुत्र महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री मा. सा. कन्नमवार यांच्या कार्याचा गौरव करीत त्याच्या स्मृती जपण्याचा मुद्दा औचित्याच्या मुद्दाद्वारे विधानपरिषद मध्ये मांडला.

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री मा. सा. कन्नमवार यांनी अत्यंत गरीबितुन पुढे येत चंद्रपूर सारख्या मागास जिल्हातील लोकांचे नेतृत्व करीत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदापर्यत मजल मारली. त्यांनी त्याच्या कार्यकाळात अनेक लोकांउपयोगी योजना आणुन सर्वसामान्य माणसाच्या विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. मुल ही त्यांची कर्मभूमी म्हणुन ओळखल्या जाते. पण अशा



महान व्यक्तिमत्वाचा पाहिजे तसा गौरव अजून पर्यत महाराष्ट्र शासनाने केला नाही असे म्हणत राज्याचे माजी महसूल मंत्री तथा आमदार एकनाथ खडसे यांनी विधानपरिषद मध्ये औचित्याच्या मुद्दाद्वारे महाराष्ट्र शासनाने मा. सा. कन्नमवार यांची शासकीय जयंती साजरी करावी, गौरव ग्रंथ, चलचित्र तयार करण्यात यावा, एखादी शासकीय उपक्रमाला मा. सा. कन्नमवार याचे नावं देण्याची मागणी केली. खडसे यांच्या मागणीला सरकार तर्फे ही सकारात्मक प्रतिसाद देत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याचे यथोचित सन्मान राखल्या जाईल. सांस्कृतीक विभागामार्फत त्याचे स्मारक उभारण्यात येईल असा शब्द दिला.खान्देश या भागातील नेते असतानाही विदर्भाच्या सुपुत्राचा विदर्भात अधिवेशन होत असतांनाही सन्मान होत नाही म्हणत विधानपरिषद मध्ये आवाज उठविल्याबाबत मुल कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती राजेंद्र उर्फ बालू कन्नमवार यांनी खडसे यांची भेट घेत त्याचे आभार व्यक्त केले.

---

## मूल शहरातील वाढीव पाणीपुरवठा योजनेची चौकशी करून अहवाल सादर करा

### जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे आदेश

**मूल प्रतिनिधी**

मुल शहरातील २८ कोटी रुपयाच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेतील त्रुटी पूर्ण न करताचाच संबंधित कंत्राटदाराला सुरक्षा ठेव आणि पूर्ण बिल देणाऱ्या जबाबदार तत्कालीन पदाधिकारी आणि अधिकाऱ्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी जिल्हाधिकारी आणि महाराष्ट्र शासनाकडे केली होती. त्याची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून चौकशी करून अहवाल देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मुलं शहरातील नागरिकांना २४ तास पाणी उपलब्ध व्हावे हया प्रमुख उद्देशाने क्षेत्राचे आमदार तथा जिल्हाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांनातून २८ कोटीची वाढीव पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली. ती पूर्ण करून घेण्याची जबाबदारी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण याच्यावर होती. सोबतच शहरांत २४ तास पाणीपुरावठा करताना त्याचे बिलिंग करण्याच्या उद्देशाने जवळपास ४५०० ग्राहकांना मीटर बसविण्यात आले त्याचे पण बिल कंत्राटदाराला अदा करण्यात आले. पण ना मुलच्या नागरिकांना २४ तास पाणी पुरवठा झाला ना मीटर चालू झाले पण कंत्राटदारला बिल देऊन नगरपालिका मोकळी झाली. या सर्व प्रकरणाची चौकशी करून दोषीवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे मुल शहर अध्यक्ष आकाश येसनकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. त्याच्या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपर यांनी मुल नगरपालिकेला विषयाच्या अनुषंगाने चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या आहेत. सदर प्रकरणाची चौकशी करून तात्काळ दोषीवर कारवाई करावी अन्यथा आम्हाला कोर्टाचे दार ठोठवावे लागेल,असा इशारा आकाश येसनकर शहर अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट )मुल यांनी दिला आहे.

## रानडुक्कराच्या हल्यात शेतकरी जखमी



**मूल प्रतिनिधी**

शेतात काम करीत असलेल्या शेतकऱ्यावर रानडुक्कराने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना मूल तालुक्यातील टेकाडी शेतशिवारात सोमवारी दुपारी १२ वाजता दरम्यान घडली. वासुदेव रामा गणवीर वय ६४ वर्ष असे जखमी झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.

मूल तालुक्यातील मौजा टेकाडी येथील वासुदेव रामा गणवीर वय ६४ वर्ष हे कुकुडचिमडा येथील शेतात धानबांधाणीचे काम सुरु असल्याने ते गेले होते. दरम्यान काम करीत असताना रानडुक्कराने शेतकरी वासुदेव गणवीर यांच्यावर हल्ला चढवून गंभीर जखमी केले. जखमी शेतकऱ्यावर मूल येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार करून चंद्रपूर रेफर केले आहे.सावली वनपरिक्षेत्रातील टेकाडी बिटातील वनकर्मचाऱ्यानी भेट देऊन पंचनामा केला आहे.

## मूल येथे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन



**मूल प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कामगार सेना तालुका शाखा मूल च्या वतीने सोमवारपासून पंचायत समिती समोर तीन दिवसीय काम बंद आंदोलन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी सुरु केले.आंदोलनात ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना,नगरपालिका व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन श्रेणी मंजूर करणे, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन लागू करणे, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना उपदान लागू करणे, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीची रक्कम कामगार भविष्य निधी संघटन या कार्यालयात करणे, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सुधारित किमान वेतन लागू करणे, वेतनासाठी लागलेली वसुलीची अट रद्द करणे, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या आकृत्ती बंधात सुधारणा करणे, जिल्हा परिषद सेवेत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधुन ऐकून रिक्त पदाच्या दहा टक्के प्रमाणे वर्ग ३ व वर्ग ४चे पदावर नियुक्ती देणे, माहे आगस्ट २० ते मार्च २०२२पर्यंतचा थकीत वेतन तात्काळ अदा करणे आदी प्रमुख मागण्यांना घेऊन कर्मचारी आंदोलन करीत आंदोलनात कर्मचाऱ्यांनी डफली वाजवीत शासनाचा निषेध नोंदविला,तर विविध नारे लावत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. संघटनेचे अध्यक्ष अमोल वाढई, सचिन महेश मांदाळे, राकेश कलसार,सिद्धार्थ मानकर, शेखर नेवारे, निशांत जेंगठे आदी कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.

# राष्ट्रीय नृत्य स्पर्धेतील विजेत्यांना १० लाख रूपयांची बक्षीसे वितरित

# मुंबईच्या श्री स्वामी समर्थ कला मंच ग्रुपला प्रथम तर पुणे येथील एंजल डान्स अकॅडमी ला द्वितीय पारितोषिक






**वरोरा :– येथील एकार्जुना चौकातील विशाल प्रांगणावर १५ ते १७ डिसेंबर दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय नृत्य स्पर्धेतील विजेत्यांना १७ डिसेंबर रोजी १० लाख रुपयांची पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आली. याप्रसंगी जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख मुकेश जीवतोडे, शिवसेना (शिंदे) गटाचे नितीन मत्ते, काँग्रेसचे जिल्हा महासचिव डॉक्टर हेमंत खापणे, बाळू पिसाळ, आशिष ठाकरे अहेतेश्याम अली उपस्थित होते.चंद्रपूर जिल्हा हा कोळसा खाणीसाठी प्रसिद्ध आहे परंतु याच कोळसा खाणीत क्षेत्रात कोळसाखान क्षेत्रात सुंदर नृत्य करणारे कोहिनूर हिरे देखील दडलेले आहेत हे आज या स्पर्धेदरम्यान सिद्ध झाले असल्याचे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे सांस्कृतिक व कार्यमंत्री आणि वनमंत्री सुधीर मनगंटीवार यांनी राष्ट्रीय नृत्य स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात केले. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की वाघ नखांचा करार करून आपण महाराष्ट्रात परतलो तेव्हा अनेक मोठे चित्रपट निर्माते भेटीला आले. त्यावेळी सर्व निर्मात्यांना सुंदर दृश्य असल्याने आपण चंद्रपूर जिल्ह्यात येऊन शूटिंग करण्याची विनंती केली होती. परंतु आजची ही नृत्य स्पर्धा पाहून केवळ शूटिंगसाठीच नव्हे तर कलाकार देखील आमच्याकडे उपलब्ध आहेत असे त्यांना आता सांगावे लागेल असे ते म्हणाले. वरोरा येथील हॉटेल ग्रीन वे व बाबुलाल आईस्क्रीम द्वारा आयोजित राजवारसा प्रॉडक्शन प्रस्तुत बुगी उगी २०२३ या भारतातील सर्वात मोठ्या राष्ट्रीय नृत्य स्पर्धेचे आयोजन १५ ते १७ डिसेंबर दरम्यान एकार्जुना चौकातील विशाल प्रांगणावर करण्यात आले होते . या स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्याला राज्याचे सांस्कृतिक तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार उपस्थित होते . ही स्पर्धा नृत्य रसिकांसाठी आनंदाची पर्वणीच ठरली आहे.**

वरोरा शहरात पहिल्यांदाच राष्ट्रीय नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते . या स्पर्धेत देशाच्या विविध भागातून आलेल्या ५०० पेक्षा अधिक स्पर्धकांनी भाग घेतला होता. ग्रुप डान्स (समूह नृत्य ) चे प्रथम पारितोषिक श्री स्वामी समर्थ कला मंच मुंबई ने पटकावले त्यांना १ लाख ५० हजार रोख प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देण्यात आले, १ लाख रुपयांचे द्वितीय पारितोषिक एंजल डान्स अकॅडमी पुणे ला देण्यात आले, तृतीय पारितोषिक ५० हजार रुपये ड्रीम टीम आग्रा ग्रुपला मिळाले, चतुर्थ पारितोषिक २० हजार रुपये आरडी वॉरियर्स ग्रुप मुंबई ने प्राप्त केले, तर दहा हजार रुपयांचे पाचवे पारितोषिक डी डी एस ग्रुप पंढरपूर ने पटकावले पटकविले .सोलो डान्स (एकल नृत्य) १ लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक कोलंबसिंह बिलासपुर याला देण्यात आले, ५० हजार रुपयांचे द्वितीय बक्षीस नागपूरच्या मयुरी इंगळे ने प्राप्त केले, तर राहुल गोड नवी मुंबई याला तृतीय पारितोषिक २० हजार रुपये मिळाले, चतुर्थ पारितोषिक १० हजार सुरज धनुस्कर अमरावती याने प्राप्त केले आणि पाच हजार रुपयांचे पाचवे पारितोषिक मुंबई येथील प्रिया नसकर ने पटकाविले.

डूयत (युगल डान्स )करीता असलेले प्रथम ८० हजार रुपयांचे पारितोषिक रियल ब्रदर्स एमपी ला देण्यात आले , द्वितीय ५० हजार रुपयांचे पारितोषिक हर्षा अँड मोहित जबलपूर , तृतीय पारितोषिक २० हजार रुपये आकाश अँड विशाल मालेगाव यांनी प्राप्त केले,योगी अँड हजमा दिल्ली यांना चतुर्थ पारितोषिक १० हजार रुपये मिळाले ,तर विधिशा अँड जास्मिन नागपूर यांनी पाच हजार रुपयांचे पाचवे पारितोषिक प्राप्त केले. किड्स डान्स (लहान मुलांचे नृत्य) करिता असलेले प्रथम ५० हजार रुपयांचे पारितोषिक इशिता बरवाड पुणे हिने पटकावले , द्वितीय २० हजार रुपयांचे पारितोषिक आशिष पुणेकर नागपूर , तृतीय पारितोषिक १० हजार रुपये जस्मिन शेख नागपूर, चतुर्थ पारितोषिक ७ हजार श्रेयश्री हजारे नागपूर आणि तीन हजार रुपयांचे पाचवे पारितोषिक विधिशा कायंदे नागपूर यांनी प्राप्त केले.

तसेच बेस्ट ऑफ वरोरा ग्रुप डान्स मध्ये मृदया नटसम्राट डान्स अकॅडमी आनंदवन वरोरा यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर एकल नृत्यात महेश बावणे वरोरा आणि डुएट मध्ये पायोष्णिका व यशश्री यांनी बाजी मारली. तसेच लहान मुलांच्या नृत्य स्पर्धेत कनिष्का सातपुते ही बेस्ट ऑफ वरोरा ठरली. स्पर्धेत सभागी स्पार्धकांना रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले . या स्पर्धेला आमदार श प्रतिभा धानोरकर यांनी भेट देऊन उपस्थितांना मार्गदर्शन करताना आयोजकांचे कौतुक केले. तसेच मनसेचे यवतमाळ जिल्ह्यातील नेते राजू उंबरकर यांनी भेटी प्रसंगी मार्गदर्शन करताना आयोजकांचे भरभरून कौतुक केले. अशा आयोजनाला मोठी हिम्मत लागते आणि ती हिंमत आयोजकांनी दाखवली यासाठी त्यांचे कौतुक करावे तेवढे कमी आहे असे ते म्हणाले. सोबतच अशी स्पर्धा वनी येथे घेण्याचा मानस त्यांनी बोलून दाखवला आणि या आयोजकांना त्यांनी आयोजनात सहभागी होण्याची विनंती केली. स्पर्धेत उपस्थित प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, मोठे व्यावसायिक आणि पत्रकार यांचा सन्मान करण्यात आला.स्पर्धेला तिन्ही दिवस प्रेक्षकांची भरभरून उपस्थिती होती . हॉटेल ग्रीन वे चे संचालक शुभम चिमुरकर व बाबुलाल आईस्क्रीम चे संचालक नीरज चौधरी यांनी स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेच्या यशस्वी ते करिता अक्षय सोनटक्के, ओंकार पिदुरकर,उज्वल लोहकरे, चेतन लुतड़े , सारथी ठाकुर ,दादा जयस्वाल, होजप्पा अली, ऋग्वेद एकरे ,फिरतोज खान, कृष्णा जैसवाल,समीर कोरम, आकाश गहुकर , चेतन जुनघरे यांनी परिश्रम घेतले.











सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .